शेती संकटात

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरित परिणाम होत आहे. प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, गहू व हरभरा पीकाचे अतोनात नुकसान होत आहे, असा अभ्यास इन्स्टिट्यूट ऑफ सस्टेनेबल कम्युनिटीजचे मांडला आहे.

हवामान बदलामुळे महाराष्ट्राला वाढत्या जोखमीचा सामना करावा लागतो आहे. राज्यातील मराठवाडा, विदर्भ व खान्देशातील काही भाग अवर्षणग्रस्त स्थितीत आहेत, असे या अहवालात मांडण्यात आल आहे. विदर्भ, मराठवाडा आणि खान्देश या विभागातील आठ जिल्ह्यांच्या पर्जन्यमान आणि तापमान यांच्या आकडेवारीचे आठवडानिहाय ३० वर्षांचे ऐतिहासिक (१९८९-२०१८) आणि पूर्वानुमान (२०२१-२०५०) परीक्षण यांत करण्यात आले आहे. त्यामध्ये विदर्भातील चंद्रपूर; अमरावती व यवतमाळ, मराठवाड्यातील औरंगाबाद; जालना व नांदेड तर खान्देशातील धुळे आणि जळगाव, या जिल्ह्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

याबाबत संस्थेच्या कृषी कार्यक्रमाचे सहयोगी संचालक रोमित सेन यांनी सांगितले की, 'अहवालात सादर केलेल्या विश्लेषणामध्ये, क्लायमेट मॉडेलिंग आणि पूर्वानुमान आदींवर भाष्य केले आहे. या परीक्षणामध्ये समुदायावर आधारित सहभाग-मूल्यांकनाचा समावेश आहे. शिवाय प्रत्येक पिकावर आणि शेतकऱ्यावर हवामान बदलांचा संभाव्य परिणाम चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी हे मूल्यांकन साप्ताहिक आकडेवारीनुसार केले आहे.'

उशिरा सुरू होणारा पावसाळा, अधूनमधून पडणारा दुष्काळ आणि पाऊस यामुळे सोयाबीन व कापूस यांच्या उगवण क्षमतेवर खूप परिणाम झाला आहे. तसेच खरीप हंगामाच्या मधोमध पडणारा मुसळधार पाऊस यामुळे बुरशीजन्य रोग, तण आणि कीटक यांची वाढ होण्याचा संभव वाढतो. याचा परिणाम सोयाबीनमधील शेंगा उत्पादनावर आणि कापसाच्या बोंड तयार होण्यावर प्रक्रियेवर होतो. तसेच येणाऱ्या काही वर्षांत गहू लागवडीसमोर धान्य परिपक्व होतानाचे उच्च तापमान हे आव्हान असेल. हरभरा लागवडीत शेंगा भरण्याच्या दरम्यान तापमानात अचानक वाढ दिसून येईल. त्यातून उत्पादनात घट होईल, असा अंदाज मांडण्यात आला आहे.

गुलशन कुमार हत्याकांड : निर्माते रमेश तौरानी यांना दिलासा कायम

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

जवळपास २४ वर्षांपूर्वी प्रसिद्ध चित्रपट निर्माते व टी-सीरीज कंपनीचे संस्थापक गुलशन कुमार यांच्या हत्येच्या प्रकरणात १९ वर्षांपूर्वी निर्दोष सुटलेला मारेकरी अब्दुल रशीद दाऊद मर्चंट याला मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. तर सबळ पुराव्यांअभावी प्रसिद्ध चित्रपट निर्माते व टिप्स इंडस्ट्रीज कंपनीचे सहसंस्थापक रमेश तौरानी यांच्या निर्दोष मुक्ततेवर शिक्कामोर्तब केले. गुलशन कुमार यांच्यावर गोळ्या झाडणारा आणि सध्या तुरुंगवास भोगत असलेला दुसरा मारेकरी अब्दुल रौफ दाऊद मर्चंट याची जन्मठेपेची शिक्षा उच्च न्यायालयाने कायम ठेवली.

इतक्या वर्षांपासुन जामिनावर असलेल्या अब्दुल रशीदला तात्काळ सत्र न्यायालयात किंवा अंधेरीमधील डी. एन. नगर पोलिस ठाण्यात शरण जाण्याचा आणि पासपोर्ट पोलिसांकडे जमा करण्याचा आदेशही न्या. साधना जाधव व न्या. नितीन बोरकर यांच्या खंडपीठाने दिला. तसेच आठवड्याभरात शरण न आल्यास सत्र न्यायालयाने रशीदविरोधात अजामीपात्र अटक वॉरंट बजावून त्याला कोठडीत घ्यावे, असेही आदेशात स्पष्ट केले.

'अब्दुल रौफ दयेस पात्र नाही'

अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा साथीदार असलेला अब्दुल रौफ हा जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना एप्रिल- २००९मध्ये फर्लोवर काही दिवसांची सुटी मिळाल्यानंतर बांग्लादेशमध्ये पळून गेला. बांग्लादेश पोलिसांनी त्याला अटक केल्यानंतर तेथील न्यायालयाने त्याला पाच वर्षांची दिली. त्या शिक्षेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर नोव्हेंबर-२०१६मध्ये तो मुंबई पोलिसांच्या ताब्यात आला. त्यानंतर विशेष मोक्का न्यायालयाने त्याला पुन्हा तुरुंगात पाठवले. 'शिक्षेनंतरही रौफच्या या गुन्हेगारी कृतींमुळे तो शिक्षा कालावधी कमी होण्यास किंवा कोणत्याही दयेस पात्र नाही', असे निरीक्षण खंडपीठाने निकालात नोंदवले.

१२ ऑगस्ट १९९७ रोजी कुमार हे नेहमीप्रमाणे अंधेरी पश्चिम जीत नगर येथील शिव मंदिरात पूजा-अर्चा करून आपल्या कारकडे निघाले असताना तिथा हल्लेखोरांनी त्यांच्यावर बेछूट गोळीबार केला होता. नदीम-श्रवण या संगीतकार जोडीतील नदीम व कुख्यात गुंड अबू सालेम यांनी या हत्येचा कट रचल्याचा आरोप होता.

सत्र न्यायालयाने २९ एप्रिल २००२ रोजी एकुण १९ आरोपींपैकी केवळ अब्दुल रौफला दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती; तर अन्य आरोपींना निर्दोष मुक्त केले होते. रौफने शिक्षेविरोधात अॅड. सतीश मानेशिंदे यांच्यामार्फत अपिल केले होते; तर राज्य सरकारने रशीद व तौरानी यांच्या सुटकेविरोधात सरकारी वकील माधवी म्हात्रे यांच्यामार्फत अपिल केले होते.

न्यायालय म्हणते..

- रौफने कुमार यांची हत्या केल्याचे निर्विवादपणे सिद्ध होते. सत्र न्यायालयाने प्रत्यक्षदर्शींच्या साक्षीतील काही त्रुटींना महत्त्व देऊन रशीदला निर्दोष ठरवले. परंतु, त्याचा हल्ल्यातील सहभाग सिद्ध होतो. त्यामुळे तोही हत्येच्या आरोपाखाली दोषी ठरतो.
- नदीम सैफी व अबू सालेम यांनी सूड उगवण्याच्या उद्देशाने कट रचला. त्यावेळी दुबईत असलेल्या सालेमशी रमेश तौरानींनी संपर्क साधला की नाही, हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा नाही. तपास यंत्रणेने गंभीर हलगर्जीपणा केला.

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल) तर्फे शिक्षणाच्या माध्यमातून 'मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज' म्हणजेच 'एमएमएस' हा व्यवस्थापनाचा महत्त्वाचा अभ्यासक्रम लवकरच सुरू करणार आहे. हा अभ्यासक्रम आयडॉलमधून सुरू करण्यास विद्यापीठाच्या विद्वत परिषदेने मान्यता दिली आहे. यानंतर यूजीसी-डीईबीने मान्यता दिल्यानंतर हा अभ्यासक्रम प्रत्यक्ष सुरू केला जाईल.

दूरस्थ शिक्षणाच्या माध्यमातून सुरू होणारा व्यवस्थापन शाखेचा एमएमएस हा अभ्यासक्रम दोन वर्षांचा असुन तो चार सत्रांमध्ये (सेमिस्टर) मध्ये विभागाला गेला आहे. आयडॉल व नियमित कॉलेजांमध्ये शिकवला जाणारा एमएमएसचा अभ्यासक्रम सारखाच असणार आहे. विद्यापीठाच्या विद्वत परिषदेने या अभ्यासक्रमाला मान्यता दिली आहे. यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या डिस्टन्स एज्युकेशन ब्युरोकडे पुढील मान्यतेसाठी पाठवला जाईल. त्यांची मान्यता मिळाल्यानंतरच हा एमएमएस अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून दूरस्थ शिक्षणाच्या माध्यमातून सुरू करण्याचा मानस आहे, असे आयडॉलचे संचालक डॉ. प्रकाश महानवर यांनी सांगितले.

> “ भारतात अनेक विद्यापीठे दूरस्थ शिक्षणाच्या माध्यमातून व्यवस्थापनाचा एमबीए अर्थात एमएमएस अभ्यासक्रम चालवतात. मुंबई विद्यापीठातूनही दूरस्थ माध्यमातून हा अभ्यासक्रम सुरू करण्याची विद्यार्थ्यांची मागणी होती. यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे एमएमएस शिक्षण घेण्याचे स्वप्न पूर्ण होईल. हा अभ्यासक्रम दर्जेदार पद्धतीने चालवण्यात येईल.
>
> – डॉ. सुहास पेडणेकर, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ.

या वर्षभराच्या कालावधीत एमएमएस अभ्यासक्रमाचे अध्ययन साहित्य तयार करण्यात येईल. तसेच एमएमएसचे दूरस्थ शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना असाइन्मेंट, प्रोजेक्ट असणार आहेत. या विद्यार्थ्यांसाठी विविध अभ्यासकेंद्रामधून प्रत्यक्ष मार्गदर्शन व प्रात्यक्षिक घेतले जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शनही केले जाणार आहे. यासाठी आयडॉलमध्ये एमएमएस अभ्यासक्रमासाठी शिक्षकांची नियुक्ती केली जाणार आहे. या एमएमएस अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आयडॉल स्वतंत्र 'प्रवेश परीक्षा' घेणार आहे.

देशात पावसाची सरा'सरी'

(पान एकवरून)

भारत येथे सरासरी किंवा त्याहून कमी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मध्य भारतात काही ठिकाणी, तसेच गंगेच्या खोऱ्यात सरासरी किंवा त्याहून अधिक पाऊस पडू शकतो. मात्र कोकणात जुलैमध्ये थोडा कमी पाऊस पडेल अशी शक्यता सध्या दिसत आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय मोहपात्रा य ांनी दिली.

सध्या पावसाने विश्रांती घेतली आहे. १९ जूननंतर मान्सूनचा देशातील प्रवास दीर्घकाळासाठी खोळंबला आहे. हा पाऊस जुलैच्या दुसऱ्या आठवड्याच्या मध्यापासून पुन्हा सक्रिय होऊ शकेल असेही ते म्हणाले. पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे देशाच्या उत्तर आणि वायव्येकडील काही भागांमध्ये उष्णतेची लहर निर्माण झाली आहे. ही परिस्थिती हळूहळू निवळेल. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात मध्यापासून पुन्हा पावसाला सुरुवात झाल्यावर तापमान घट अनुभवायला मिळेल. देशाच्या इतर भागांमध्ये वेळेआधीच मान्सून पोहोचल्यानंतर राजस्थान, पश्चिम उत्तर प्रदेश, हरयाणा, चंडिगड, दिल्ली, पंजाब येथे मात्र मान्सून अजूनही पोहोचलेला नाही. मान्सूनचा हा प्रवास आणखी किमान आठवडाभर तरी पुढे सुरू होण्याची शक्यता नाही. त्यामुळे तापमानातही प्रचंड वाढ झाली असून काही भागांमध्ये उष्णतेची लाट निर्माण झाली आहे. ही परिस्थिती येत्या दोन ते तीन दिवसांत बदलेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पाकिस्तानवरून येणाऱ्या पश्चिमी वाऱ्यांमुळे ही उष्णतेची लाट निर्माण झाली आहे. मध्य प्रदेशच्या वायव्य भागातही पुढील दोन दिवस ही परिस्थिती कायम असेल.

शेतीवर परिणाम

राज्यातही ८ जुलैपर्यंत फारसा पाऊस पडण्याची शक्यता नाही. सर्वसाधारण कोकणामध्ये खूप पाऊस पडतो. मात्र यंदा मॉडेलवरून भारतीय हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार कोकणात कमी पाऊस पडेल. मध्य महाराष्ट्राच्या उत्तरेकडील काही भागात, राज्यात दक्षिणेला, तसेच विदर्भात काही ठिकाणी पावसाची तूट निर्माण होईल अशी शक्यता आहे. जूनमध्ये राज्यात सरासरीच्या २७ टक्के पाऊस अधिक आहे. मुंबई उपनगरांत सरासरीच्या ८१ टक्के पाऊस अधिक होता. तर शहरामध्ये २४ टक्के. पालधर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्येही अतिरिक्त पावसाची नोंद झाली आहे. सध्या खोळंबलेल्या पावसामुळे शेतीवर परिणाम झाला आहे.

युरोपीय देशांची कोव्हिशील्डला मान्यता

(पान एकवरून)

घेतलेल्यांना प्रवास करण्यास परवानगी दिली आहे. शेंगेन राष्ट्र असल्याने स्वित्झर्लंडनेही कोव्हिशील्डला मान्यता दिली आहे. तर, भारत सरकारने अधिकृत केलेल्या लशींपैकी कोणतीही लस घेतलेल्या भारतीयांना आपल्या देशात येऊ देण्यास परवानगी दिली जाईल, याची एस्टोनियाने पुष्टी केली आहे. त्यामुळे आता कोव्हिशील्ड घेतलेल्यांना या देशांमध्ये जाता येणार आहे.

युरोपीय महासंघाचे डिजिटल करोना प्रमाणपत्र अर्थात 'ग्रीन पास' गुरुवारपासून अंमलात येणार आहे. हे प्रमाणपत्र मिळालेल्यांना करोनाकाळात मुक्त प्रवास करण्याची मुभा मिळणार आहे. 'ग्रीन पास' योजनेंतर्गत युरोपीय औषधे संस्थेने (ईएमए) मान्यता दिलेल्या लशी घेतलेल्या व्यक्तींना युरोपीय महासंघाच्या सदस्य देशांमध्ये प्रवास निर्बंधांमधून सूट दिली जाईल. या शिवाय राष्ट्रीय स्तरावर किंवा जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) मान्यता दिलेल्या लशी स्वीकारण्याचे युरोपीय महासंघाच्या प्रत्येक सदस्य देशाला स्वातंत्र्य आहे.

भारतात अशी भीती व्यक्त केली जात होती की, कोव्हिशील्ड किंवा कोव्हॅक्सिन लस घेतलेले लोक 'ग्रीन पास' योजनेंतर्गत युरोपीय महासंघाच्या सदस्य देशांमध्ये जाण्यास पात्र ठरण्याची शक्यता नाही. तर, ग्रीन पास प्राप्त करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने मान्यता दिलेली कोव्हिशील्डसारखी लस स्वीकारण्याचा पर्याय युरोपीय महासंधाच्या सदस्य देशांकडे असेल, असे महासंधाच्या एका अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले होते.

१५० रुपयांसाठी हजार रुपयांचे खाते

(पान एकवरून)

नियमित किमान सहा महिन्यांतून एकदा व्यवहार होत नसल्याने अनेक विद्यार्थ्यांचे खाते बंद झाले आहे. विद्यार्थ्यांच्या उघडलेल्या बँक खात्यात किमान शिल्लक नसल्याने दंड आकारणीही होत आहे. त्यामुळे ज्यावेळी कोणतीही रक्कम जमा केली जाते अशावेळी सर्वप्रथम दंडाची आकारणी कपात केल्याने लाभार्थींचे नुकसान होते व पालकांचा रोष शिक्षकांवर येतो.

सध्या करोनाच्या स्थितीत विद्यार्थ्यांचे खाते उघडण्यासाठी पालकांनी बँकेत कसे जायचे, असे मतही पालक व्यक्त करत आहेत. शासन निर्णयानुसार शालेय पोषण आहाराचा उन्हाळी सुट्टीतील लाभ बँक खात्यात एकावेळी जमा करण्याचे नमूद आहे. लाभार्थी विद्यार्थ्यांच्या खात्यात केवळ उन्हाळी सुट्टी कालावधीतील रक्कम जमा करावयाची आहे. दोन महिन्यातील अंदाजित कार्य दिवस ३५ गृहीत धरल्यास इयत्ता १ ते ५ साठी दर दिवशी ४.४८ रुपये दराने एकूण फक्त १५६ रुपये ८० पैसे आणि इयत्ता ६ ते ८ साठी दर दिवशी ६.७१ रुपये दराने एकूण फक्त २३४ रुपये ८५ पैसे जमा होतील. या पैशांसाठी पालकांना आपल्या पाल्याचे बँकेत खाते काढण्यासाठी खटाटोप करावा लागत आहे. मागील वर्षी उन्हाळी सुट्टी कालावधीचा पोषण आहार विद्यार्थ्यांना ज्याप्रमाणे शाळेतून वितरित करण्यात आला तीच पद्धती अत्यंत योग्य असल्याचे मत पालक व्यक्त करत आहेत.

पोषण आणि शिक्षणाचा मोठा संबंध

पोषण आणि शिक्षणाचा मोठा संबंध आहे. योग्य पोषण झाले तर योग्य शिक्षण होऊ शकते. ग्रामीण भागात आदिवासी पाड्यांवर आजही अनेक विद्यार्थी दुपारच्या जेवण्यासाठी शाळांवर अवलंबून असतात. यामुळे शाळेत अन्न शिजवून विद्यार्थ्यांना देणे हीच पद्धत योग्य असल्याचे मत शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते भाऊसाहेब चासकर यांनी सांगितले. सध्याच्या परिस्थितीत पैसे खात्यात जमा करणे धान्य वाटपाला पर्याय नसला तरी पोषण आहारचे पैसे खात्यात जमा करण्याची पद्धत कायमस्वरूपी राहू नये, असेही चासकर यांनी स्पष्ट केले.

आरटीपीसीआरचा जाच

(पान एकवरून)

विमानतळावर उतरताना ४८ तास आधी आरटी-पीसीआर करावी लागते. अनेकदा श्रीनगरमध्ये दोन-तीन दिवसाचे काम असते. ते उरकून लेह विमानतळावर जाताना पुन्हा ४८ तास आधीची आरटी-पीसीआर करावी लागते. ते काम उरकून मुंबईच्या विमानतळावर उतरताना पुन्हा ७२ तास आधीची चाचणी आवश्यक असते. यामुळे अवघ्या दहा दिवसांत अनेकदा तीन-तीन वेळा चाचणी होते. मी स्वतः मागील तीन महिन्यांत किमान २० हून अधिक वेळा या चाचणीला सामोरे गेलो आहे.'

याबाबत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील अधिकाऱ्यांनी सांगितले की, 'राज्यांतर्गत विमानतळांसाठी आरटी-पीसीआरचे निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. पण महाराष्ट्राबाहेरील प्रत्येक विमानतळावरून राज्यातील कुठल्याही विमानतळावर उतरायचे असल्यास आरटी-पीसीआर अनिवार्य आहे. त्या व्यक्तीने लस घेतलेली असो वा नसो, लशीच्याचे दोन्ही मात्रा घेतलेल्या असो वा नसो, आरटी-पीसीआर ही करावीच लागेल. ती किमान ७२ तास आधी केलेली नसल्यास विमानतळावर करून घेतली जाईल, असे राज्य सरकारचे निर्देश आहेत. त्यामुळे विमानतळ प्रशासनाला ते पाळावेच लागतील.'

वेगवेगळे नियम

लसीकरणासंबंधी विमानसेवा कंपन्यांचे नियमही वेगवेगळे आहेत. काही विमानसेवा कंपन्या आरटी-पीसीआर असल्याशिवाय प्रवाशाला विमानात प्रवेश देत नाहीत. तर काही विमानसेवा कंपन्यांचा तसा कुठलाही निर्णय नाही. पण विमानसेवा कंपनीने चाचणी अहवाल बधितला नाही तरी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद किंवा नांदेड, या कुठल्याही विमानतळावर उतरल्यानंतर आरटी-पीसीआर अहवाल बधितला जातोच. नसल्यास प्रवाशाला चाचणी करावीच लागते. हे नियम प्रत्येक राज्यानुसारही वेगवेगळे आहेत. त्यामुळे प्रवाशांचा गोंधळ उडतो.

गॉडफ्रे फिलिप्स इंडिया लिमिटेड

सीआयएन: L16004MH1936PLC008587

नोंदणीकृत कार्यालय: 'मॅक्रोपोलो बिल्डींग', तळमजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, लालबाग, मुंबई - ४०० ०३३ दूरध्वनी: ०२२-६१९५ २३०० फॅक्स : ०२२-६१९५ २३१९

व्यावसायिक कार्यालय: 'ओमेक्स स्क्वेअर', प्लॉट नं. १४, जसोला डिस्ट्रिक्ट सेंटर, जसोला, नवी दिल्ली - ११००२५ फोन: ०११-२६८३२१५५, ६१११९३००

सूचना

शारदा क्रॉपकेम लिमिटेड

CIN: L51909MH2004PLC145007

नोंदणीकृत कार्यालय: प्राईम बिझनेस पार्क, दशरथलाल जोशी मार्ग, विलेपार्ले (पश्चिम) मुंबई ४०००५६; दूरध्वनी क्र.: ०२२ ६६७८ २८००; इमेल: co.sec@shardaintl.com

CERSAI

40 दशलक्ष+ बोजा चढविलेल्या

मालमत्तांचा डाटाबेस केवळ आपल्या व्यवसायाचं हित जपण्यासाठी...

CERSAI (सेंट्रल रजिस्ट्री ऑफ सिक्युरिटायझेशन अॅसेट रिकंस्ट्रक्शन अँड सिक्युरिटी इंटरेस्ट ऑफ इंडिया)

आपण मालमत्ता/संपत्तींवर कर्ज पुरवठा करण्याच्या व्यवसायात असाल तर - आपण CERSAI ची माहिती घेणे गरजेचे आहे, कारण अनेक आघाडीच्या बँका, NBFCs आणि वित्तीय संस्थांनी आजवर तेच केले आहे. बोजा असलेल्या जंगम, स्थावर आणि अमूर्त मालमत्तांचा एक सर्वसमावेशक डाटाबेस तुम्हाला माहितीपूर्ण आणि गुंतवणुकीचे निर्णय घेण्यात सहाय्य करतो.

40 दशलक्षहून अधिक संपत्तींच्या आमच्या डाटाबेसवर भारतातील आघाडीच्या बँकांनी विश्वास ठेवला आहे. हा डाटाबेस निरंतरपणे वाढत असून तो धनको कंपन्या/व्यक्तिंना मालमत्तांसंबंधी उपलब्ध महत्वाची माहिती सहजपणे पुरवत आहे.

मालमत्तांवरील अनामत हेतुंच्या फायलिंगसाठी एकत्रिकृत रजिस्ट्री उपलब्ध करुन भारतातील EoDB पुढाकारांना पाठिंबा देण्यात CERSAI खूप महत्वाची मदत करतात. CERSAI देते आत्मविश्वास, जो हजारो आघाडीच्या बँका आणि वित्तीय संस्था दररोज घेत असतात.

आपल्या व्यवसायाच्या हितांचे रक्षण करण्यासाठी आणखी एक पाऊल टाकण्याकरिता www.cersai.org.in/CERSAI/home.prg इथे भेट द्या.

मल्टीपल वित्त पुरवठ्याची जोखीम कमी होते

एकत्रिकृत डाटाबेस

कोणीही फाईल करु शकतो

योग्य खबरदारीला पाठिंबा